



दैनिक अचूक वेध, अचूक बातमी

# अक्षराज

संपूर्ण महाराष्ट्रातून एकाच वेळी प्रसिद्ध Email : newsaksharaj2021@gmail.com




वर्ष : ०५ | अंक : ३३७, पाने : ०४, किंमत : ०३ रुपये | बुलडाणा, शनिवार, दि.१८ जुलै २०२६ | संपादक : विनोद कैलास गोरे | RNI NO. : MAHMAR/2022/82056

## सोनम वांगचुक यांच्या भेटीला सुप्रिया सुळे दिल्लीत

**अक्षराज : वृत्तसंकलन**

**दि.१७, नवी दिल्ली :** राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी आज दिल्लीत जंतरमंतर मैदानात सुरु असलेल्या आंदोलनाला भेट दिली. सोनम वांगचुक यांच्या सुरु असलेल्या उपोषणाला पाठिंबा देण्यासाठी सुप्रिया सुळे या जंतरमंतर मैदानावर गेल्या. तिथे त्यांनी सोनम वांगचुक यांची विचारपूस केली. यावेळी त्यांनी तरुणांना संबोधित केलं. सोनम वांगचुक यांची विचारपूस केल्यानंतर सुप्रिया सुळे यांनी माध्यमांना प्रतिक्रिया दिली. यावेळी त्यांनी सोनव वांगचुक यांच्या आंदोलनाचा मुद्दा आपण हिवाळी अधिवेशनात मंडू. तसेच हिवाळी अधिवेशनाआधी आणखी दोन ठिकाणी मांडू, असं सुप्रिया सुळे यांनी सांगितलं.

राज्यात आंदोलन चाललं असेल तर ती आमची नैतिक जबाबदारी आहे की, समाजात ज्या गोष्टी सुरु आहेत त्या सरकार दरबारी पोहोचवल्या पाहिजेत. समाजातील पालकांमध्ये, तरुण पिढीत एक भावना आहे, इथे आंदोलन सुरु आहे. केंद्रीय शिक्षणमंत्री




धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घ्यावा या मागणीसाठी आंदोलन चालू आहे. आम्ही जे लोकप्रतिनिधी आहोत, आमची नैतिक जबाबदारी असते की, समाजात ज्या गोष्टी झाल्या आहेत त्या संसदेत मांडल्याच पाहिजेत, असं सुप्रिया सुळे म्हणाल्या.

**हिवाळी अधिवेशनाआधी दोन ठिकाणी विषय मांडणार**

संसद सुरु होण्याआधी दोन ठिकाणी मी या विषयावर बोलणार आहे. एकतर रविवारी सकाळी सर्वपक्षीय बैठकीत बोलणार आहे. केंद्र सरकारने ही रविवारी सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे. या बैठकीत मी शेतकऱ्यांच्या आत्महत्येचा विषय, भारतात कमी झालेला पाऊस, त्याचबरोबर शिक्षणात झालेला सावळा गोंधळ, राम मंदिरचे जे व्हिडीओज येत आहेत, असे अनेक गंभीर विषय देशासमोर आहेत. सर्वपक्षीय बैठकीत हे सर्व विषय आम्ही महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीसोबत बोलून मांडणार आहोत, अशी प्रतिक्रिया सुप्रिया सुळे यांनी दिली.

सोमवारी सकाळी १० वाजता काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी इंडिया आघाडीची बैठक बोलावली आहे. या बैठकीत मी इथल्या भावना आणि इथल्या तरुणांमध्ये अस्वस्थता याबाबत बोलणार आहे, अशी माहिती सुप्रिया सुळे यांनी दिली.

**एनडीएममध्ये सहभागी होणार?**

सुप्रिया सुळे यांना यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष एनडीएमध्ये सहभागी होणार का? असा प्रश्न पत्रकारांनी विचारला. त्यावर त्यांनी याबाबत मला तरी कल्पना नाही. ना एनडीएने मला फोन केला आणि ना मी एनडीएला फोन केला, अशी प्रतिक्रिया दिली.

हे बघा आम्ही लोकप्रतिनिधी आहोत. आमचे मायबाप महाराष्ट्राची आणि देशाची जनता आहे. त्यांची कामे करण्यासाठी आम्ही निवडून येतो. त्यामुळे अनेक वेळा प्रत्येक मंत्र्यांकडे आम्हाला जावं लागतं. त्यामुळे आम्ही जातो. आम्ही फोटो काढतो. आम्ही ट्विट करतो. आम्ही ट्विट केले नसते तर तुम्हाला कळले असते का आमची भेट झाली?, असा सवाल त्यांनी केला.

## खापरखेडा परिसरात गुंडगिरी!
### महावितरणच्या तंत्रज्ञाला बेदम मारहाण



**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** थकीत वीज बिलाच्या वसुलीसाठी आणि पूर्वसूचना देण्यासाठी गेलेल्या महावितरणच्या एका वरिष्ठ तंत्रज्ञाला शिवीगाळ करत, कॉलर पकडून जमिनीवर पाडून बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना १६ जुलै रोजी दुपारी १२ वाजताच्या सुमारास चनकापूर परिसरातील अण्णामोड येथे घडली. या भ्याड हल्ल्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. याप्रकरणी खापरखेडा पोलिसांनी तात्परतेने कारवाई करत दोन आरोपी भावांविरुद्ध शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी गंभीर गुन्ह्यांची नोंद केली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार फिर्यादी रवींद्र लिलाराम ठाकरे वय ३७, रा. वॉर्ड क्र. ०१, आठवडी बाजार, कोराडी हे महावितरण खापरखेडा येथे वरिष्ठ तंत्रज्ञ म्हणून कार्यरत आहेत. त्यांच्याकडे चनकापूर परिसरातील अण्णामोड सप्तशृंगी मंदिर परिसरातील वीज बिल वसुली व देखभालीची जबाबदारी आहे..याच परिसरात राहणारे योगेश रॉय आणि त्यांचा लहान भाऊ मनजीत रॉय यांच्याकडे मे आणि जून महिन्याचे वीज बिल थकीत होते. महावितरणकडून त्यांना वारंवार नोटीस देऊन सुद्धा त्यांनी बिलाचा भरणा केला नव्हता.

गुरुवारला दुपारी १२ वाजताच्या सुमारास ठाकरे हे थकीत बिलाबाबत पूर्वसूचना देण्यासाठी आणि वीज मीटरची पाहणी करण्यासाठी गेले होते. यावेळी ठाकरे हे कर्तव्यावर असताना आरोपी योगेश रॉय आणि मनजीत रॉय हे दुचाकीने आले व तुझी आमच्या घरापर्यंत येण्याची हिंमत कशी झाली? असे म्हणत त्यांनी ठाकरे यांना अश्लील शिवीगाळ करण्यास सुरुवात केली. यावेळी ठाकरे यांनी त्यांना समजावण्याचा प्रयत्न केला. मात्र, सदर घटनेतील आरोपींनी थेट त्यांच्या अंगावर धावून जाऊन कॉलर पकडली व जमिनीवर पाडून लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली शिवाय खापरखेड्यात माझे कोणी काही बिघडू शकत नाही तू कुठेही जा अशी धमकी देत आरोपींनी ठाकरे यांना जीवे मारण्याचाही प्रयत्न केला.

अचानक झालेल्या हल्ल्यानंतर पीडित कर्मचारी व फिर्यादी रवींद्र ठाकरे यांनी थेट खापरखेडा पोलीस ठाणे गाठून लेखी तक्रार दाखल केली. खापरखेडा पोलिसांनी घटनेचे गांभीर्य ओळखून आरोपी योगेश रॉय आणि मनजीत रॉय यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून महावितरण कंपनीच्या अधिकारी व कर्मचारी वर्गात तीव्र संतापाची लाट उसळली आहे.

## आषाढी वारी २०२६ : व्हीआयपी दर्शनबंदीची जिल्हाधिकाऱ्यांकडून कडक अंमलबजावणी

**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१७, पंढरपूर :** आषाढी शुद्ध एकादशीच्या पार्श्वभूमीवर श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेता जिल्हाधिकारी एस. कार्तीकेयन यांनी शुक्रवारी स्वेरी कॉलेज ते श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरापर्यंत पायी चालत दर्शन रांग व पत्राशेडची सखोल पाहणी केली. यावेळी त्यांनी दर्शन रांगेतील भाविकांशी थेट संवाद साधत उपलब्ध सुविधा आणि दर्शन व्यवस्थेची माहिती घेतली. तसेच व्हीआयपी दर्शनबंदी आदेशाची प्रत्यक्ष अंमलबजावणी होत असल्याची खातरजमा करण्यासाठी व्हीआयपी दर्शन नोंदणी रजिस्टरचीही तपासणी केली.

आषाढी यात्रा काळात भाविकांना सुलभ व जलद दर्शन मिळावे, यासाठी आपत्ती व्यवस्थापन कायदा व राज्य शासनाच्या निर्णयानुसार व्हीआयपी दर्शन बंद करण्याचे आदेश जिल्हाधिकाऱ्यांनी यापूर्वीच जारी केले आहेत. त्या आदेशाची काटेकोर अंमलबजावणी होत आहे की नाही, याची त्यांनी स्वतः पाहणी केली.

पाहणीदरम्यान पत्राशेडमधील पिण्याचे पाणी, सुलभ शौचालये, आरोग्य सुविधा, मॅट, सीसीटीव्ही व्यवस्था, आपत्ती व्यवस्थापन कक्ष आदी सुविधांची तपासणी करण्यात आली. दर्शन रांगेत घुसखोरी होऊ नये, यासाठी अतिरिक्त सुरक्षा रक्षक नेमण्याच्या सूचना त्यांनी मंदिर समितीला दिल्या.

गोपाळपूर येथील पुलाची पाहणी करून सुरक्षेच्या दृष्टीने तातडीने दुरुस्ती करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच गोपाळपूर ते स्वेरी कॉलेज या दर्शन मार्गावर पुरेशी व प्रखर प्रकाशयोजना



करण्याचे आदेशही संबंधित विभागांना देण्यात आले.

यावेळी जिल्हाधिकारी कार्तीकेयन यांनी मंदिरातील सीसीटीव्ही नियंत्रण कक्षाला भेट देत व्हीआयपी दर्शन नोंदणी रजिस्टरची तपासणी केली आणि सर्व नोंदींची पडताळणी केली. दरम्यान, वाखरी पालखी तळावर पावसाचे पाणी साचू नये यासाठी पूर्वी बसविण्यात आलेल्या लहान व्यासाच्या पाइपऐवजी मोठ्या व्यासाचे पाइप टाकण्यात येणार असल्याची माहिती त्यांनी दिली. त्यामुळे पाण्याचा जलद निचरा होऊन पालखी तळावर पाणी साचणार नसल्याचे त्यांनी स्पष्ट केले. याबाबत राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण आणि नगरपालिका प्रशासनाला आवश्यक सूचना देण्यात आल्या आहेत. या पाहणीवेळी प्रांताधिकारी सचिन इथापे, मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, कार्यकारी अभियंता अमित निमकर, तहसीलदार सचिन लंगुटे, मुख्याधिकारी महेश रोकडे, व्यवस्थापक प्रविणकुमार घम तसेच संबंधित विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

## चिमुकलीवर अत्याचार करणाऱ्या त्या नराधमाला फाशी द्या




### पेण तालुका शिवसेनेचे पोलिस ठाण्यात निवेदन सादर

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, पेण (रायगड) :** तीन दिवसा पूर्वीच पेण तालुक्यातील पाटणेश्वर हद्दीतील काजुर्ले आदिवासी वाडीतील एका पाच वर्षाच्या चिमुरडीवर अत्याचार करून तिला ठार मारण्याची काळीमा फासणारी घटना घडल्यानंतर सदर अत्याचार करणाऱ्या आरोपीला पेण पोलिसांनी ताब्यात घेतले असेल तरी त्या आरोपीला लवकरात लवकर फाशीची शिक्षा देण्यात यावी याबाबतचे निवेदन आज उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या पेण तालुका शिवसेनेच्या वतीने पोलिस निरीक्षक संदीप भोसले यांच्याकडे सादर करण्यात आले.

पेण तालुक्यातील कांजुर्ले आदिवासी वाडीमध्ये घडलेल्या या अमानूष घटनेनंतर संपूर्ण रायगड जिल्हा हादरला होता. सदर घटना ही अत्यंत घृणास्पद व मानवतेला काळिमा फासणारी असून यापूर्वी देखील अशाच चिमुरड्या आदिवासी मुलांबाबत घटना घडून गेल्या असल्याने या घटनेकडे शासनाने गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक असल्याचे शिवसेनेने दिलेल्या निवेदनातून म्हटले आहे.

या वारंवार घडणाऱ्या घटनांना आळा बसण्यासाठी ज्याप्रमाणे बलात्कार प्रकरणी बदलापूर, उरण, कल्याण येथील केसेस फास्ट ट्रॅक कोर्टात चालवल्या गेल्या त्याचप्रमाणे सदर केस जलदगतीने न्यायालयात सुनावणीसाठी घेऊन नुकत्याच नरसापूर येथील घटनेत दोषी आरोपीला फाशीची शिक्षा सुनावण्यात आली त्याच पद्धतीने पेण येथील देखील या घटनेत त्याच गतीने सुनावणी होऊन फाशीची शिक्षा देण्यात यावी अशी मागणी देखील शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या शिवसेनेने दिलेल्या निवेदनातून करण्यात आली आहे.

यावेळी शिवसेना तालुका प्रमुख समीर म्हात्रे यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना छत्रपती शिवाजी महाराजांच्या रायगडात होणारे माता भगिनी मुलींवर होणारे हे अत्याचार थांबले पाहिजेत. रायगड जिल्ह्याच्या पोलिस अधीक्षक स्वतः एक महिला असून आम्हाला त्यांच्याकडून फार मोठ्या अपेक्षा आहेत. सदर निवेदन पोलिस प्रशासनाने लवकरात लवकर गृहमंत्र्यांपर्यंत पोहोचवावा आणि पीडित कुटुंब आणि पीडितेला न्याय मिळवून द्यावा असे सांगितले. सदर निवेदन देते वेळी तालुका प्रमुख समीर म्हात्रे यांच्या सोबत महिला जिल्हा संघटिका दीपश्री पोटफोडे, उप तालुका प्रमुख चेतन मोकल, शहर संपर्कप्रमुख विजय पाटील, उपशहर प्रमुख समीर साठी, नगरसेवक सद्दाम आवास्कर, राकेश मोकल, संजय पानसे इत्यादींसह शिवसैनिक उपस्थित होते.

## कर्जमाफीची अंमलबजावणी लवकरच : पालकमंत्री डॉ. अशोक उईके

**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** विविध कारणाने अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी राज्य शासनाने ' पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ ' जाहीर केली आहे. या योजनेत आता सर्व पात्र शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांपर्यंत कर्जमाफी देण्याची घोषणा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नुकतीच विधानसभेत केली. या महत्वपूर्ण शेतकरी कर्जमुक्ती योजनेची चंद्रपूर जिल्ह्यात तातडीने आणि पारदर्शक पद्धतीने अंमलबजावणी केली जाईल, अशी ग्वाही जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली.

जिल्हाधिकारी कार्यालयात आढावा घेताना ते माहिती देत हेते. यावेळी जिल्हाधिकारी वसुमना पंत उपस्थित होत्या.

चंद्रपूर जिल्ह्यातील ७२ हजार ३८८ खातेदारांची माहिती



कर्जमुक्तीची व्यापकता वाढली, दोन लाखांचे कर्ज सर्वांना माफ

पोर्टलवर अपलोड करण्यात आली असून, यात ४३ हजार ८१६ खातेदार जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे तर २८ हजार ५७२ खातेदार हे राष्ट्रीयकृत बँकेचे आहेत. यापूर्वी महात्मा जोतीराव फुले कर्जमाफी योजनेत लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांसाठी असलेली ५० हजार रुपयांची अट आता पुर्णपणे रद्द करण्यात आली आहे. सर्व पात्र शेतकऱ्यांना २ लाख रुपयांपर्यंतची कर्जमाफी मिळणार आहे. तसेच २०२६-२७ मधील नियमित परतफ `डीची अट सुध्दा रद्द करण्यात आली आहे.

पुढे पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले की, २ लाखांपेक्षा अधिक थकबाकी असलेल्या शेतकऱ्यांनी २ लाखावरील रक्कम भरली तर अशा शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. २ लाखांपर्यंतची रक्कम शासनाकडून माफ केली जाणार आहे. राज्य शासनाच्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना- २०२६ अंतर्गत पात्र शेतकऱ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम जमा होईपर्यंत त्यांच्या थकीत पीक कर्जावर कोणतेही व्याज आकारु नये, असे स्पष्ट निर्देश सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभागाने जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँका आणि विविध कार्यकारी सहकारी संस्थांना दिले आहेत.

शेतकऱ्यांच्या हिताला सर्वोच्च प्राधान्य देत शासनाने हा महत्वपुर्ण निर्णय घेतला आहे. राज्य शासनाच्या या योजनेचा उद्देश शेतकऱ्यांना कर्जबाजारीपासून मुक्त करुन त्यांना पुन्हा नियमित कर्जपुरवठा उपलब्ध करुन देणे हा आहे. पात्र शेतकऱ्यांना थकीत पीक कर्जाची रक्कम थेट त्यांच्या कर्जखात्यात ऑनलाईन पध्दतीने जमा करण्यात येणार असून संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक पध्दतीने राबविण्यात येत आहे. दरम्यान, शासनाच्या आदेशाचे काटेकोरपणे पालन करण्याच्या सूचना सर्व बँकांना देण्यात आल्या आहेत, असेही पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले.




## सुपरस्टार राजेश खन्ना

हिंदी चित्रपट सृष्टीतील पहिले सुपरस्टार म्हणून ओळखले जाणारे जेष्ठ अभिनेते राजेश खन्ना यांची आज  चौदावी पुण्यतिथी. राजेश खन्ना यांचा जन्म २९ डिसेंबर १९४२ रोजी पंजाबमधील अमृतसर येथे झाला. राजेश खन्ना यांचे मूळ नाव जतीन खन्ना असे होते. त्यांच्या आईचे नाव चंद्राणी खन्ना तर वडिलांचे नाव लाला हिराणी असे होते. त्यांचे वडील शाळेत मुख्याध्यापक होते. त्यांच्या एका जवळच्या नातेवाईकांना मुलबाळ नव्हते म्हणून त्यांच्या आई वडिलांनी त्यांना त्या नातेवाईकांकडे दत्तक दिले. त्यांच्या नवीन आईचे नाव लीलावती खन्ना तर वडिलांचे नाव चुनीलाल खन्ना असे होते. चुनीलाल खन्ना रेल्वे कंत्राटदार होते. ते मुंबईत राहत होते. राजेश खन्ना हे सेंट सबिस्टाईन गॉन हायस्कूल येथे शिकत असताना त्यांची रवी कपूर यांच्याशी ओळख झाली. रवी कपूर म्हणजेच हिंदी चित्रपट सृष्टीतील प्रसिद्ध अभिनेते जितेंद्र. राजेश खन्ना व जितेंद्र यांनी कॉलेज जीवनात अनेक नाटकात एकत्र काम केले. नंतर उच्च शिक्षण घेण्यासाठी राजेश खन्ना हे पुण्यात आले. पुण्यात दोन वर्ष शिक्षण घेतल्यावर ते पुन्हा मुंबईला परतले. मुंबईत काही दिग्दर्शकांनी टॅलेंट हंट स्पर्धा आयोजित केली. राजेश खन्ना यांच्या काकांनी त्यांचे नाव या स्पर्धे करिता नोंदवले. ते नोंदवताना त्यांनी त्यांचे नाव जतीन खन्ना ऐवजी राजेश खन्ना म्हणून नोंदवले पुढे याच नावाने ते ओळखले जाऊ लागले. या स्पर्धे त त्यांनी पहिल्या क्रमांकाचे पारितोषिक मिळवले त्यांच्या अभिनयाने त्याकाळातील दिग्गज दिग्दर्शक प्रभावित झाले. १९६६ साली चेतन आनंद यांनी त्यांना आखरी खत या चित्रपटात संधी दिली हाच त्यांचा पहिला चित्रपट. हा चित्रपट ऑस्करला गेला होता. पहिल्याच चित्रपटातील त्यांच्या अभिनयाने चित्रपट रसिक तसेच जाणकार प्रभावित झाले त्यामुळे त्यांना अनेक चित्रपट मिळाले. त्याकाळातील यशस्वी दिग्दर्शक असणारे शक्ती सामंत यांनी त्यांना आराधना या चित्रपटात नायकाची भूमिका दिली. या चित्रपटात शर्मिला टागोर या त्यांच्या नायिका होत्या. चित्रपट सुपरहिट झाला. या चित्रपटातील सर्व गाणी लोकप्रिय झाली. या चित्रपटा नंतरच राजेश खन्ना सुपरस्टार म्हणून ओळखले जाऊ लागले. राजेश खन्ना यांची अदाकारी, संवाद फेकीची लकब यावर तरुणाई फिदा झाली. विशेषतः कॉलेज मधील मुली त्यांच्यावर जीव ओवाळून टाकू लागल्या. त्यांचे चाहते त्यांच्या गाडीचे चुंबन घ्यायचे. मुली त्यांच्या गाडीची धूळ आपल्या भांगेत भरत. बऱ्याचश्या मुलींनी त्यांच्या फोटोशी लग्न केले होते. त्यांना चाहत्यांचे जितके प्रेम लाभले तितके प्रेम कोणत्याच कलाकाराला लाभले नाही. राजेश खन्ना यांचे सलग १५ चित्रपट सुपरहिट झाले हा एक विक्रम आहे. तो अजूनही कोणत्या अभिनेत्याला तोडता आला नाही. शर्मिला टागोर, मुमताज, अशा पारेख, तनुजा यांच्याशी त्यांची चांगली केमिस्ट्री जमली. सत्तरच्या दशकात राजेश खन्ना सुपरस्टार पदावर आरूढ झाले होते. चालण्या बोलण्याची विशिष्ट ढब, मानेला खास झटका देत, हातवारे करत नाचण्याची अनोखी शैली, जबरदस्त संवाद फेक आणि ओठावर रुंजी घालतील अशी गाणी यामुळे राजेश खन्ना हे अफलातून रसायन बनून गेले. त्याकाळात सर्वाधिक मानधन घेणारे राजेश खन्ना यांची प्रेम प्रकरणेही गाजली पण १९७३ साली त्यांनी आपल्या पेक्षा कितीतरी लहान वयाच्या डिंपल कपाडिया यांच्याशी विवाह केला. १९९२ साली काँग्रेसच्या वतीने त्यांनी दिल्ली मतदार संघातून लोकसभेची पोटनिवडणुक लढवली आणि ते खासदार म्हणून निवडून आले. १८ जुलै २०१२ रोजी राजेश खन्ना यांनी चाहत्यांना अलविदा म्हणत जगाचा निरोप घेतला आणि बॉलिवूडचा पहिला सुपरस्टार काळाच्या पडद्याआड गेला.बाबूमोशाय....... बाबू मोशाय जिंदगी और मौत उपरवाले के हात है जहाँपणा... जिसे ना तो आप बदल सकते है ना मै.... हम सब तो रंगमंच की कटपुतलीया है, जीसकी डोर उपरवालेकी उंगलीओमे बंधी है....कब कोण कैसे उठेगा कोई बता नहीं सकता..... आनंद कभी मरते नहीं वह हमेशा याद रहते है....

**राजेश खन्ना यांना विनम्र अभिवादन!**

**- श्याम ठाणेदार**

# तिकिटांचा काळाबाजार आणि कोकणकरांचे हाल !

यंदाच्या गणेशोत्सवासाठी कोकण रेल्वेच्या गाड्यांचे तिकीट आरक्षण सुरू झाले आहे. मात्र, नेहमीप्रमाणे यंदाही चाकरमान्यांच्या वाट्याला तीव्र निराशा आली आहे. रेल्वेचे बुकिंग सुरू होताच अवघ्या काही सेकंदांतच सर्व प्रमुख गाड्यांची तिकिटे संपली आहेत.  शिमगा आणि गणपती हे कोकणातील पारंपारिक उत्सव. गेल्या काही वर्षांत कोकणपट्टीत राहणाऱ्या जवळपास प्रत्येक घरातील किमान एक माणूस नोकरी व्यवसायासाठी मुंबई ठाण्यात येऊन राहिला आहे. त्याच्यातील काहींची तिसरी तर काहींची चौथी पिढी आज या शहरांत राहत आहे, शिक्षण घेऊन नोकरी व्यवसाय करत आहे. असे असले तरी या सर्वांची नाळ अजूनही कोकणातील आपल्या गावाशी, घराशी आणि कुटुंबाशी घट्ट जोडलेली असल्याने किमान या दोन सणांच्या निमित्ताने जवळपास प्रत्येक कोकणकर आपल्या गावी जायला निघतो.




गणपती अगदी तोंडावर आल्याने आत्ता गणपतीत गावी जाण्याची सिद्धता या सर्वांची सुरु झाली आहे, त्यासाठी कार्यालयातून सुट्टी घेणे. गणपतीच्या सजावटीचे साहित्य खरेदी करणे, कुटुंबासाठी आणि गावी राहणाऱ्या आपल्या वाड वडिलांसाठी नवीन कपडे खरेदी करणे आदींसोबत गावी जाण्यासाठी तिकीट मिळवण्याची धडपडही सुरु झाली आहे. कोकणात रेल्वे सुरु झाल्यापासून कोकणकरांची मोठी सोय झाली आहे त्यामुळे कोकणकर पहिले प्राधान्य रेल्वेला देतात त्यासाठी बुकिंग केव्हापासून सुरु होणार याची वाट पहिली जाते. एकदा ती तारीख कळली कि तिकीट खिडक्यांवर मोठमोठ्या रांगा पाहायला मिळतात. कोकणकरांच्या सोयीसाठी कोकण रेल्वे प्रशासन या दोन सणांच्या निमित्ताने दरवर्षी जादा गाड्या सोडते, यंदाही प्रशासनाच्या वतीने जादा रेल्वे आणि एस टी बसेस सोडण्यात येणार आहेत. मात्र दरवर्षी या सर्व रेल्वेगाड्या तिकीट खिडकीवर आपला नंबर येण्याआधीच फुल्ल झालेल्या पाहायला मिळतात. ऑनलाईन तिकीट बुक करणाऱ्यांनाही हाच अनुभव येतो. तात्काळ बुकींगच्या बाबतीतही हा अनुभव आज अनेकांनी घेतला आहे. त्यामुळे या बुकिंग जातात कुठे हा यक्षप्रश्न यानिमित्ताने प्रत्येकालाच पडतो. मग सुरु होते तिकीट मिळवण्यासाठीची धडपड. कोणाच्या ओळखीने तिकीट मिळते का ? बुकिंग एजंटकडे तिकीट मिळते का याचा शोध घेतला जातो. आश्चर्याची गोष्ट म्हणजे तासनतास रांगेत उभे राहूनही तिकीट मिळत नाही मात्र या एजंट मंडळींना अधिकचे पैसे देऊन सहज तिकीट मिळते. मग या एजंट मंडळींकडे तिकीट येते तरी कुठून ? अर्थातच यामागे मोठा भ्रष्टाचार लपला असून रेल्वेतील अधिकारी मंडळींपासून तिकीट बुक करणारे कर्मचारीही या साखळीत सहभागी झालेले असतात. ऑनलाईन तिकीट बुकींगच्या बाबतीत केला जाणारा मोठा स्कॅम आयआरटीसीने शोधून काढला आहे.  जानेवारी ते मे २०२५ दरम्यान आयआरसीटीसीने तब्बल २.९ लाख अशी तिकीट बुकिंग्स शोधून काढली होती.  तिकिट बुकिंग सुरु झाल्यानंतर अवघ्या पाच मिनिटांमध्ये तिकीटे बूक केली जातात; मात्र ही सर्व तिकीटे सर्वसामान्य प्रवाशांकडून बुक केली जात नसून फसवणूक करणाऱ्या एजंट मंडळींकडून केली जात असल्याचे उघड झाले होते. ही तिकीटे ज्या खात्यांवरुन खरेदी केली जातात ती खाती खोटी माहिती देऊन आणि ऑटोमॅटिक तंत्रज्ञान वापरुन हाताळली जातात. ज्यामुळे तिकीटांची विक्री सुरु झाल्यानंतर काही वेळातच या खात्यांवरुन तिकीटे बुक केली जातात आणि सर्वसामान्यांच्या हाती लागते ती केवळ निराशा.  'द टाइम्स ऑफ इंडिया'ने दिलेल्या वृत्तानुसार भारतीय रेल्वेने खोटी माहिती आणि आयडी देऊन तयार केलेली अडीच कोटी खाती निष्क्रिय केली आहेत. तसेच २० लाख खाती रिव्हेरिफिकेशनअंतर्गत असल्याची माहिती समोर आली होती. यापैकी अनेक खाती ही तात्पुरत्या ईमेल आयडीवरुन तयार करण्यात आली होती. हे ईमेल आयडी मोजक्या वेळा वापरले जाण्यासाठीच असतात. त्यामुळेच यामागील खरे आरोपी शोधणे कठीण असते.

या खोट्या खात्यांच्या माध्यमातून तिकीटांची दलाली करणारे मोठ्या प्रमाणात तिकीटे बुक करतात आणि नंतर अधिक किंमतीला ती सर्वासामान्य, गरजू लोकांना विकून नफा कमवतात. उत्सवाच्या काळात आणि सुट्ट्यांच्या काळात तिकीटांचा काळाबाजार मोठ्या प्रमाणात होतो. जेव्हापासून कोकण रेल्वे सुरु झाली आहे तेव्हापासून दरवर्षी हा त्रास कोकणकरांना सहन करावा लागत आहे. यावर उपाय काढणार तरी कोण ? आजमितिला मोठमोठे दिग्गज मंत्री कोकणाला लाभलेले आहेत. पुढच्या १० पिढ्या बसून खातील एव्हढी संपत्ती  कोकणकरांच्या जीवावर त्यांनी उभी केली आहे. ही मंडळी या भ्रष्टाचाराकडे, कोकणकरांवर होत असलेल्या या अन्यायाला केव्हा वाचा फोडणार आहेत ?

गेल्या काही वर्षांपासून काही राजकीय पक्ष आणि नेतेमंडळी कोकणकरांना आपल्या गावी जाता यावे यासाठी स्वखर्चातून खासगी आणि एसटी बसेस विनामूल्य उपलब्ध करून देतात. काहीजण रेल्वेचे कन्फर्म तिकीटही विनामूल्य मिळवून देतात; मात्र गणेशोत्सव हा श्रद्धेचा उत्सव असल्याने अनेक कोकणकरांना इतरांच्या मेहेरबानीतून हा उत्सव साजरा करायचा नसतो. गणरायाच्या कृपेनेच आपला चरितार्थ चालला असून गणेशोत्सवासाठी आपल्या स्वकमाईतून पैसा खर्चावा ही त्यांची मनोमन इच्छा असते अशा भाबड्या गणेशभक्तांनी दरवर्षी तिकिटासाठी संघर्षच करायचा का ? संघर्ष करूनही तिकीट काही मिळत नाही, मग इच्छा नसतानाही एजंटच्या घशात अधिकचे पैसे कोंबून पुन्हा भ्रष्टाचाराला खतपाणी घालायचे का? ही लुबाडणूक कोकणकरांनी आणखी किती वर्षे सहन करायची ? भ्रष्टाचार ही देशाला लागलेली कीड आहे. या किडीतून काही जण श्रीमंत होतात मात्र सामान्य माणूस त्यामध्ये पिचला जातो. कोकणकरांची होत असलेली ही पिळवणूक थांबवण्यासाठी सरकार काही करणार आहे कि नाही ?

**जगन घाणेकर**
**घाटकोपर, मुंबई**
**संपर्क क्रमांक : ९६६४५५९७८०**

# गुरुजी श्रीमंत झाले पण शाळा अजूनही गरीबच आहे!

काल परवा जिल्हा परिषदेच्या शाळा सुरू झाल्या...

एका पडक्या, जीर्ण झालेल्या शाळेसमोरून जात होतो. तेवढ्यात शहरातून नव्या कोऱ्या चारचाकीतून, टापटीप सुटाबुटात गुरुजी आले. ते दृश्य पाहिलं आणि मन अस्वस्थ झालं.

सहजपणे वीस-पंचवीस वर्षांपूर्वीची आठवण झाली...

तेव्हा गुरुजीही गरीब होते आणि शाळाही गरीब होती. पगार कमी असल्यामुळे गुरुजी गावातच राहायचे. गावाच्या प्रत्येक घराशी त्यांचं नातं होतं. विद्यार्थ्यांच्या आई-वडिलांशी संवाद होता. मुलगा शाळेत आला नाही तर गुरुजी थेट घरी जायचे.

त्या कौलारू, मातीच्या भिंती असलेल्या शाळांनी या देशाला आयएएस दिले, डॉक्टर दिले, अभियंते दिले, सैनिक दिले, शास्त्रज्ञ दिले, उद्योगपती दिले. त्या शाळांनी देश घडवला.

त्या काळी घरात बापाचा जितका दरारा होता, तितकाच गुरुजींचाही होता. काही ठिकाणी तर देवापेक्षाही गुरुजींचा मान मोठा होता.

मग काळ बदलला,

गुरुजींचे दिवस पालटले. मोठे पगार झाले. शहरात घरे झाली. गाड्या आल्या. सुखसोयी आल्या. हे सगळं योग्यच आहे, त्याचा आनंदच आहे.

पण एक प्रश्न मनाला सतावत राहतो...

गुरुजींचं दारिद्र्य संपलं, मग शाळेचं दारिद्र्य का संपलं नाही?

शाळेचं छप्पर अजूनही गळतंय...

भिंती अजूनही पडतायत...

पटसंख्या कमी होत चालली आहे...

आणि तब्बल १७ हजार जिल्हा परिषद शाळा कायमच्या बंद पडल्या.

ही केवळ शाळा बंद झाली नाहीत...

ही गरीबांच्या स्वप्नांची दारं बंद झाली.

ही हजारो गावांच्या भविष्याची हत्या झाली.

ही लाखो मुलांच्या संधींची गळचेपी झाली.

आज परिस्थिती इतकी दयनीय झाली आहे की शाळेला फुगे लावून, रॅली काढून, गुलाबाचं फूल देऊन पालकांना विनंती करावी लागते,

कृपया आपल्या मुलाला आमच्या जि प शाळेत प्रवेश द्या.

गरीब बाप आजही कर्ज काढून मुलाला खाजगी शाळेत पाठवतो. कारण त्याला विश्वास राहिलेला नाही. त्याला वाटतं, मी गरीब आहे, पण माझं मूल तरी गरीब राहू नये.

ही वेळ का आली?

फक्त सरकार जबाबदार आहे का?

माझा प्रश्न माझ्या सर्व शिक्षक मित्रांना आहे...

सरकारची वाट किती दिवस पाहणार?

तुमच्या पगारातील एक टक्का रक्कम वर्षातून एकदा आपल्या शाळेसाठी खर्च केली तर काय बिघडेल?

गावातील माजी विद्यार्थ्यांना एकत्र आणा...

गावातून वर्गणी गोळा करा...

शाळेच्या रंगरंगोटीपासून ग्रंथालयापर्यंत एखादा उपक्रम स्वतः उभा करा...

निवृत्त शिक्षकांनाही माझी नम्र विनंती...

घरी बसून वेळ घालवण्यापेक्षा आठवड्यातून एक-दोन दिवस आपल्या जवळच्या जिल्हा परिषद शाळेत जा. दोन तास मुलांना शिकवा. तुमचा अनुभव ही त्या मुलांची मोठी संपत्ती आहे.

लक्षात ठेवा,

तुमची ओळख, तुमचा सन्मान, तुमचा पगार, तुमचं घर, तुमची गाडी... या सगळ्याचा पाया त्या जिल्हा परिषद शाळेनेच घातला आहे.

आज त्या शाळेला तुमची गरज आहे.

सरकार बदलतील...

धोरणं बदलतील...

अधिकारी बदलतील...

पण गावातील शाळा वाचवायची असेल, तर शिक्षकांनी पुन्हा एकदा फक्त नोकरी करणारे कर्मचारी न राहता गुरुजी व्हावं लागेल.

कारण...

शाळा वाचली तर गाव वाचेल...

गाव वाचलं तर समाज वाचेल...

आणि समाज वाचला तरच देशाचा भविष्यकाळ उज्वल राहील.

**जय महाराष्ट्र !!**

**- गणेश जाधव**
**नवी मुंबई**

# ग्राहक आयोगात मनुष्यबळाचा दुष्काळ; ५०% पदे रिक्त; न्यायासाठी ग्राहकांची वर्षानुवर्षे प्रतीक्षा

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, कर्जत (रायगड) :** महाराष्ट्रातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग तसेच राज्य ग्राहक आयोगातील सुमारे ५० टक्के पदे अनेक वर्षांपासून रिक्त असल्याने ग्राहकांना वेळेत न्याय मिळणे कठीण झाले आहे.

ग्राहक संरक्षण कायद्यानुसार बहुतांश तक्रारींचा ९० दिवसांत निपटारा होणे अपेक्षित असतानाही आवश्यक अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या अभावामुळे हजारो प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहत असून ग्राहकांना न्यायासाठी प्रदीर्घ प्रतीक्षा करावी लागत आहे.

या पार्श्वभूमीवर अलिबाग येथील ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. अजय उपाध्ये यांनी दि. १४ जुलै २०२६ रोजी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तसेच राज्याचे मुख्य सचिव यांना सविस्तर निवेदन पाठवून राज्यातील ग्राहक आयोगांमधील सर्व रिक्त पदे तातडीने भरण्याची मागणी केली आहे.

**महत्त्वाची पदे वर्षानुवर्षे रिक्त**

निवेदनात अध्यक्ष, सदस्य, व्यवस्थापक, लेखाधिकारी, शिरस्तेदार, सहायक अधीक्षक, लेखापाल, लघुलेखक, टंकलेखक तसेच कनिष्ठ व वरिष्ठ लिपिक यांसारखी अनेक महत्त्वाची पदे वर्षानुवर्षे रिक्त असल्याचे नमूद करण्यात आले आहे. आवश्यक मनुष्यबळ उपलब्ध नसल्यामुळे आयोगाच्या कामकाजावर मोठा परिणाम होत असून ग्राहकांना न्याय मिळण्यास मोठा विलंब होत असल्याची बाब त्यांनी निदर्शनास आणून दिली आहे.

**९० दिवसांचा नियम कागदावरच!**

ग्राहक संरक्षण कायद्यानुसार तक्रारींचा निपटारा ९० दिवसांच्या आत होणे बंधनकारक असतानाही अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या कमतरतेमुळे अनेक प्रकरणे वर्षानुवर्षे प्रलंबित राहत आहेत. त्यामुळे ग्राहक आयोगावरील सर्वसामान्यांचा विश्वासही डळमळीत होत असल्याची खंत ॲड. उपाध्ये यांनी व्यक्त केली.

**ग्राहक राजा जागा हो की केवळ घोषणाबाजी?**

राज्य सरकारकडून ग्राहक राजा जागा हो, संघर्षाचा धागा हो अशी जनजागृती केली जाते. मात्र आयोगांमधील रिक्त पदांकडे दुर्लक्ष होत असल्याने ही घोषणा केवळ घोषणाबाजी ठरत असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. अनेक जिल्हा ग्राहक आयोगांची अवस्था 'आयसीयू मधील रुग्णासारखी' झाल्याचे ही त्यांनी नमूद केले.

**उच्चस्तरीय चौकशीची मागणी**

राज्यातील जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग आणि राज्य ग्राहक आयोगातील रिक्त पदांची तातडीने भरती करून आयोगांचे कामकाज सुरळीत करावे, अशी मागणी ॲड. अजय उपाध्ये यांनी केली आहे.

या निवेदनाच्या प्रती राज्यपाल, विधानसभा अध्यक्ष, विधान परिषद सभापती, रायगडचे खासदार सुनील तटकरे तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनाही माहितीसाठी पाठविण्यात आल्या आहेत.

This letter was written by owner, publisher, editor - Vinod Kailas Gore by Gayatri Traders at Main Road, At.Po.Chikhli, Tq. Chikhli, Dist. Buldana (MS) Pin No.443201 published from Indira Nagar Ward No.27 Buldana (MAHARASHTRA) Pin No.443001.
Editor, Printer and Publisher do not necessarily agree with the text of this letter. Legal disputes in Buldana Court. Email : newsaksharaj2021@gmail.com **Editor : Vinod Kailas Gore Mob.: 8605313202**
हे पत्र मालक, प्रकाशक, संपादक विनोद कैलास गोरे यांनी गायत्री ट्रेडर्स, मेन रोड, मु.पो. चिखली, ता. चिखली, जि. बुलडाणा (म.रा.) पिन क्रमांक ४४३२०१ येथे मुद्रित करून इंदिरा नगर वॉर्ड क्रमांक २७ बुलडाणा पिन क्रमांक ४४३००१ या ठिकाणाहून प्रकाशित केले आहे.
या पत्रात प्रसिद्ध झालेल्या मजकुराबाबत संपादक, मुद्रक, प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. कायदेशीर वादविवाद बुलडाणा न्यायालयीन कक्षेत. Email : newsaksharaj2021@gmail.com संपादक : विनोद कैलास गोरे मोबा.: ८६०५३१३२०२

## थोडक्यात बातम्या

### विद्यार्थ्यांनी तांत्रिक शिक्षणाची कास धरावी – प्राचार्य गावंड




**अक्षराज : संग्राम ठाकूर**

**दि.१७, उरण (रायगड) :** आधुनिक युग हे विज्ञान, तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) यांचे युग असून विद्यार्थ्यांनी पारंपरिक शिक्षणासोबत तांत्रिक शिक्षणाची कास धरणे ही काळाची गरज आहे. स्पर्धेच्या युगात टिकून राहण्यासाठी प्रत्येक विद्यार्थ्याने तंत्रज्ञान आत्मसात करून त्याचा प्रभावी वापर करण्याची तयारी ठेवली पाहिजे, असे प्रतिपादन प्राचार्य सुविद्य गावंड यांनी अकरावीच्या नवप्रवेशित विद्यार्थ्यांच्या स्वागत व मार्गदर्शन कार्यक्रमात केले. ते पुढे म्हणाले की, आजच्या विद्यार्थ्यांनी कोणत्याही शाखेतील शिक्षण घेत असताना आधुनिक तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्ता (अख) यांचा अभ्यास करून त्यांचा सकारात्मक वापर करण्यासाठी विशेष मेहनत घ्यावी. यामुळे भविष्यातील स्पर्धात्मक जगात यश मिळविणे अधिक सुलभ होईल. यावेळी रामचंद्र म्हात्रे विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, दहावीनंतरचा अकरावीचा टप्पा हा विद्यार्थ्यांच्या आयुष्यातील अत्यंत महत्त्वाचा टप्पा आहे. भविष्यातील यशस्वी वाटचालीचा हा श्रीगणेशा असून विद्यार्थ्यांनी नवीन दिशा, नवीन संधी आणि नवीन ध्येय स्वीकारताना शिस्त, सातत्य आणि परिश्रम यांना प्राधान्य द्यावे. जीवनातील प्रत्येक टप्प्यावर शिस्त हीच यशाची गुरुकिल्ली ठरते, असेही त्यांनी नमूद केले. कार्यक्रमाची सुरुवात दीप प्रज्वलन, ज्ञानप्रसारक शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष स्वर्गीय प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे यांच्या प्रतिमेचे पूजन, सरस्वती पूजन, ईशस्तवन आणि स्वागतगीताने झाली.

या कार्यक्रमाला शिक्षक मित्र प्राचार्य बाळासाहेब म्हात्रे महाविद्यालयाचे प्राचार्य सुविद्य गावंड, रामचंद्र म्हात्रे, विद्यालयाचे प्राचार्य सुभाष ठाकूर, शरद केणी, पत्रकार संग्राम ठाकूर तसेच पालक प्रतिनिधी सुवर्णा पाटील यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन रोहिणी गोरे यांनी केले, तर आभार प्रदर्शन निवास गावंड यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी विद्यालयातील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी विशेष परिश्रम घेतले. अकरावीमध्ये नव्याने प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

### आषाढी यात्रेत भाविकांसाठी मंदिर समितीचा सेवाभाव (दर्शन रांगेत मोफत चहा, थंड पाणी व खिचडी वाटप सुरू)



**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१७, पंढरपूर :** आषाढी यात्रेनिमित्त श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरात दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समितीने दर्शन रांगेतील भाविकांसाठी मोफत चहा, शुद्ध थंड पिण्याचे पाणी आणि तांदळाच्या खिचडीची विशेष व्यवस्था केली आहे. यात्रेदरम्यान एकही भाविक उपाशी राहू नये आणि दर्शनाच्या प्रतीक्षेत कोणालाही गैरसोय होऊ नये, या उद्देशाने ही सेवा सुरू करण्यात आली असल्याची माहिती कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके यांनी दिली. दर्शन रांगेतील तांदळाच्या खिचडीच्या वाटपाचा शुभारंभ आज मंदिर समितीच्या सदस्या श्रीमती शकुंतला नडगिरे यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा, विभाग प्रमुख विनोद पाटील तसेच विशाल माने उपस्थित होते. मंदिर समितीने दर्शन रांगेतील विविध ठिकाणी स्टॉल उभारून दिवसरात्र शुद्ध थंड पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली असून भाविकांना नियमितपणे चहाचेही वाटप करण्यात येत आहे. याशिवाय दररोज तांदळाची खिचडी दिली जात असून आषाढी एकादशीच्या दिवशी उपवास करणाऱ्या भाविकांसाठी विशेष साबुदाण्याच्या खिचडीचे वाटप करण्यात येणार आहे.

ही सेवा श्री संत गजानन महाराज मठ, अकोला येथील स्वयंसेवक अत्यंत समर्पित भावनेने राबवत असून त्यांच्या सेवेमुळे दर्शनासाठी तासन्तास रांगेत उभ्या असलेल्या हजारो भाविकांना मोठा दिलासा मिळत आहे. तसेच अन्नदानेश्वर महाराज, जिल्हा बिदर (कर्नाटक) आणि जळगाव सेवा समिती यांच्या सहकार्याने रिद्धी-सिद्धी दर्शन मंडपात भाविकांसाठी मोफत अन्नदानाचा शुभारंभ करण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापक प्रविणकुमार घम यांनी दिली.

### केमिकल सोडणाऱ्या नराधमांवर कठोर कारवाई कधी? पाटणकरांचा सवाल

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** गेल्या ५ दिवसापूर्वी रात्रीचे कोयना नदीच्या पात्रात कोणीतरी अज्ञात व्यक्तीने घातक रसायनयुक्त केमिकल सोडल्याने संपूर्ण पाटण शहरात एकच खळबळ उडाली होती. नदीच्या पाण्याला फेस येणे, रंग बदलणे आणि दुर्गंधी येण्याने पाणी विषारी झाले का? पिण्याने कावीळ, किडनी फेल होणार का? अशी भीती पाटण शहरातील नागरिकात पसरली होती.

या पार्श्वभूमीवर नगरपंचायतीने आणि आरोग्य विभागाने तात्काळ पाण्याचे नमुने घेऊन सरकारी प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवले होते. आता त्याचा अहवाल आला असून कोयना नदीचे पाणी शुद्धीकरणानंतर पिण्यायोग्य आहे असा दिलासादायक अहवाल प्राप्त झाला आहे. त्यामुळे पाटण शहरातील नागरिकांची मोठी काळजी मिटली असली तरी, नदीत विष सोडणाऱ्यांवर कठोर कारवाई झालीच पाहिजे, अशी संतप्त मागणी पाटण शहरातील नागरिक करत आहेत.

५ दिवसांपूर्वी रात्रीचे पिण्याच्या पाण्याच्या जॅकवेल जवळ तामकडे हद्दीत पाण्यावर काळपट रंग दिसून आला. पाण्याला तीव्र केमिकलचा वास येत होता त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. ही बातमी वाऱ्यासारखी पसरताच नागरिकांनी थेट नगरपंचायतीवर धाव घेतली. सोशल मीडियावर पाणी पिऊ नका असे मेसेज व्हायरल झाले होते.परिस्थितीचे गांभीर्य ओळखून नगरपंचायतीच्या पाणीपुरवठा विभागाने आणि तालुका आरोग्य अधिकाऱ्यांनी तात्काळ ३ ठिकाणाहून पाण्याचे नमुने घेतले.जॅकवेल पॉईंट, फिल्टर हाऊस इनलेट, शहरातील नळाचे पाणी,हे नमुने प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या कराड प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठवण्यात आले होते.काल सकाळी प्राप्त झालेला अहवालपिण्यायोग्य आहे. नागरिकांनी घाबरून जाऊ नये, पाणी उकळून आणि गाळून प्यावे.

हा अहवाल येताच नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे.पण गुन्हेगार मोकाटच आहे पाटणकरांचा संताप कायम आहे. पाणी पिण्यायोग्य असले तरी प्रश्न संपलेला नाही. नदीत केमिकल कोणी सोडले? हा गंभीर गुन्हा आहे. त्यामुळे पाटण शहरातील नागरिकांनी या घटनेचा तीव्र निषेध केला आहे.कोयना नदीचे पाणी सध्या सुरक्षित असले तरी या घटनेने पाटणच्या पाणी सुरक्षेचा मोठा प्रश्न समोर आणला आहे. प्रशासन आता केमिकल माफियांना शोधून कठोर कारवाई करते का, याकडे संपूर्ण पाटण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

# महामाया इन्फ्रा कंपनी तातडीने सुरू करा

## ७०० कामगारांच्या रोजगारासाठी आ.जोरगेवार यांची पालकमंत्र्यांकडे मागणी



**अक्षराज : वसंत वडस्कर**

**दि.१७, चंद्रपूर :** चंद्रपूर तालुक्यातील बेलसनी येथील महामाया इन्फ्रा प्रा. लि. कंपनीने कोणतीही पूर्वसूचना न देता अचानक कामकाज बंद केल्याने सुमारे ७०० कामगारांवर बेरोजगारीची वेळ आली आहे. या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेत आ. किशोर जोरगेवार यांनी आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. प्रा .अशोक उईके यांची जिल्हाधिकारी कार्यालयात भेट घेऊन निवेदन सादर केले. कंपनी तातडीने सुरू करण्यासह संपूर्ण प्रकरणाची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी त्यांनी यावेळी केली.

आ.किशोर जोरगेवार यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, ३० जून २०२६ रोजी कंपनी व्यवस्थापनाने कोणतीही पूर्वकल्पना किंवा सूचना न देता कंपनी बंद करण्याचा निर्णय घेतला. या निर्णयामुळे सुमारे ७०० कामगारांचा रोजगार एकाच दिवसात हिरावला गेला असून त्यांच्या कुटुंबांवर उपासमारीची वेळ आली आहे. मुलांचे शिक्षण, वैद्यकीय खर्च तसेच दैनंदिन उदरनिर्वाहाचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

जिल्ह्यातील इतर कोळसा धुलाई (कोल वॉशरी) प्रकल्प सुरळीत सुरू असताना केवळ महामाया इन्फ्रा कंपनीचेच कामकाज बंद करण्यात आल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी निर्माण झाली आहे. त्यामुळे हा निर्णय नेमका कोणत्या कारणामुळे घेण्यात आला, याची निष्पक्ष आणि उच्चस्तरीय चौकशी होणे आवश्यक असल्याचे आ. जोरगेवार यांनी निवेदनात नमूद केले आहे.

या पार्श्वभूमीवर महामाया इन्फ्रा कंपनीचे कामकाज तातडीने पूर्ववत सुरू करण्यात यावे, कामावरून कमी करण्यात आलेल्या सर्व कामगारांना पुन्हा सेवेत रुजू करून घ्यावे, कंपनी अचानक बंद करण्यामागील कारणांची उच्चस्तरीय चौकशी करण्यात यावी तसेच कामगारांचा रोजगार सुरक्षित करून त्यांच्या कुटुंबांचा उदरनिर्वाह अबाधित राहील, यासाठी शासनाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी त्यांनी पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांच्याकडे केली.

महामाया इन्फ्रा कंपनी बंद झाल्यामुळे निर्माण झालेला हा प्रश्न केवळ एका कंपनीपुरता मर्यादित नसून शेकडो कामगार आणि त्यांच्या कुटुंबांच्या भविष्याशी निगडित आहे. त्यामुळे शासनाने या प्रकरणात त्वरित हस्तक्षेप करून कामगारांना न्याय मिळवून द्यावा, अशी ठाम भूमिका आमदार किशोर जोरगेवार यांनी यावेळी मांडली.

## बी.जे.एस. महाविद्यालयाचा कॅडेट कॅप्टन सुनील आथणुर यांना ऑल इंडिया नौसैनिक शिबिरात गोल्ड पदक




**अक्षराज : भुषण बावचीकर**

**दि.१७, वाघोली (पुणे) :** भारतीय राष्ट्रीय छात्र सेना (एनसीसी) च्या नौदल विंगच्या सर्वोच्च वार्षिक शिबिरात महाराष्ट्राचा गौरव वाढवत बी.जे.एस.आर्ट्स, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज, वाघोली, पुणे येथील कॅडेट कॅप्टन सुनील आथणुर यांनी सीमनशिप स्पर्धेत स्वर्ण पदक तर ड्रिल स्पर्धेत कांस्य पदक जिंकले आहे.

ऑल इंडिया नौसैनिक शिबिर (AINSC) २०२६ चा समारोप लोणावळा येथील आयएनएस शिवाजी येथे झाला. महाराष्ट्र एनसीसी संचालनालयाच्या वतीने आयोजित या प्रतिष्ठित शिबिरात देशभरातील १७ संचालनालयांमधील ६१२ नौदल विंग कॅडेट्स (यात २०४ महिला कॅडेट्स) सहभागी झाले होते.समारोप समारंभाचे मुख्य अतिथी म्हणून मेजर जनरल विवेक त्यागी, अतिरिक्त महासंचालक, महाराष्ट्र एनसीसी संचालनालय आणि कमोडोअर एस. पार्थिबन, कमांडिंग ऑफिसर, आयएनएस शिवाजी यांनी संयुक्तपणे परेडची मान्यता दिली. महाराष्ट्र एनसीसी संचालनालय व आयएनएस शिवाजी येथील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. शिबिरादरम्यान कॅडेट कॅप्टन सुनील आथणुर यांनी सीमनशिप आणि ड्रिल स्पर्धांमध्ये अप्रतिम कामगिरी करत महाराष्ट्र संचालनालयाचे नाव रोशन केले. बोट पुलिंग, ड्रिल, सीमाफोर, फायरिंग, शिप मॉडेलिंग आदी स्पर्धांसोबतच ड्रोन ऑपरेशन्स, सायबर सुरक्षा, समुद्री नेव्हिगेशन, अग्निशमन, डॅमेज कंट्रोल यासारख्या आधुनिक विषयांवर व्यावहारिक प्रशिक्षण देण्यात आले. शिबिरादरम्यान लेफ्टनंट जनरल विरेंद्र वत्स, धडच्, डच्, तडच्, महासंचालक, एनसीसी यांनी भेट देऊन कॅडेट्सना प्रेरणा दिली. त्यांनी शिस्त, उत्साह आणि राष्ट्रसेवेच्या भावनेसाठी कॅडेट्सचे कौतुक केले.

बी.जे.एस. संघटनेचे सर्व पदाधिकारी, ३ महाराष्ट्र नौदल एनसीसी युनिट, महाविद्यालयातील प्राचार्य, प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी, छात्र सैनिक, विद्यार्थी आणि पालक यांच्याकडून कॅडेट कॅप्टन सुनील आथणुर यांचे हार्दिक अभिनंदन करण्यात आले आहे.

यापूर्वी बी.जे.एस. महाविद्यालयातील कॅडेट स्वराज भंडारे यांनी जानेवारी २०२६ मध्ये नवी दिल्ली येथे प्रजासत्ताक दिन २०२६ च्या मुख्य संचलनात भाग घेतला होता, तर कॅडेट कॅप्टन पवन राठोड यांनी ऑल इंडिया नौसैनिक कॅम्प २०२५ मध्ये महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व केले होते.

राष्ट्रीय छात्र सेना विभागाच्या या सातत्यपूर्ण यशाबद्दल सुरेश साळुंके, बी.जे.एस. WERC प्रकल्प व्यवस्थापक आणि डॉ.रवींद्रसिंह परदेशी, महाविद्यालय मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आनंद व्यक्त केला. शाम पाटील (कार्यालय अधीक्षक), चक्रधर शेळके (सीटीओ), सब ले.डॉ. शिवाजी सोनवणे (असोसिएट एनसीसी अधिकारी) आणि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनीषा बोरा यांनी कॅडेटचे अभिनंदन केले. या उत्कृष्ट यशाने बी.जे.एस. महाविद्यालयासह संपूर्ण महाराष्ट्राला अभिमान वाटत असल्याचे सर्व स्तरांतून कौतुक व्यक्त होत आहे.

## आषाढी यात्रेसाठी मंदिर समिती सज्ज; २५० कर्मचारी व स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण




**अक्षराज : विकास सरवळे**

**दि.१७, पंढरपूर :** आषाढी एकादशी यात्रेदरम्यान लाखो वारकरी व भाविकांच्या सुरक्षिततेसाठी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीने महत्त्वपूर्ण पुढाकार घेत सुमारे २५० कर्मचारी व स्वयंसेवकांना आपत्ती व्यवस्थापनाचे विशेष प्रशिक्षण दिले. जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष एस. कार्तीकेयन यांच्या सूचनेनुसार शुक्रवारी श्री संत तुकाराम भवन येथे दिवसभर हे प्रशिक्षण पार पडले. दि. २५ जुलै रोजी होणाऱ्या आषाढी एकादशीच्या शासकीय महापूजेच्या पार्श्वभूमीवर राज्यासह देशभरातून लाखो भाविक पंढरपुरात दाखल होणार आहेत. संभाव्य आपत्कालीन परिस्थितीला तत्काळ व प्रभावी प्रतिसाद देता यावा, यासाठी मंदिर समितीने प्रशिक्षणाचे आयोजन केले.

प्रशिक्षणामध्ये सीपीआर (हृदयक्रिया व श्वसनक्रिया पूर्ववत करणे), प्रथमोपचार, दोरीच्या सहाय्याने बचावकार्य, बंदिस्त जागेतील शोध व बचाव, जखमींना सुरक्षितरीत्या हलविण्याच्या पद्धती, सुरक्षित स्थलांतर, गर्दी व्यवस्थापन, आग लागल्यास करावयाची कार्यवाही तसेच विविध आपत्कालीन परिस्थितींमध्ये समन्वय राखून काम करण्याबाबत प्रत्यक्ष प्रात्यक्षिकांसह सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले.अग्निशमन अधिकारी संभाजी कारले, १०८ रुग्णवाहिका सेवेचे जिल्हा समन्वयक डॉ. अनिल काळे, सारथी युथ फाऊंडेशनचे रामचंद्र वाघमारे, इंडियन रेस्क्यू अकादमीचे बजरंग होटकर तसेच आपदा सखी साक्षी सर्वगोड यांनी प्रशिक्षण दिले. विशेषतः गर्दीच्या ठिकाणी हृदयविकाराचा झटका, श्वसनाचा त्रास, बेशुद्धावस्था आदी प्रसंगी तातडीने मदत कशी करावी, याचे प्रात्यक्षिक सादर करण्यात आले.दर्शन रांगा, मंदिर परिसर, भक्तनिवास, अन्नछत्र, दर्शन मंडप, वैद्यकीय मदत केंद्रे व विविध सेवा केंद्रांवर कार्यरत कर्मचारी व स्वयंसेवकांसाठी हे प्रशिक्षण अत्यंत उपयुक्त ठरणार असून, यात्रेदरम्यान भाविकांना अधिक सुरक्षित, तत्पर व गुणवत्तापूर्ण सेवा देण्यास याचा मोठा फायदा होणार आहे.

यावेळी मंदिर समितीचे कार्यकारी अधिकारी राजेंद्र शेळके, व्यवस्थापक प्रविणकुमार घम, लेखाधिकारी मुकेश अनेचा यांच्यासह विभागप्रमुख, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. सुरक्षित, सुव्यवस्थित आणि निर्विघ्न आषाढी यात्रा पार पाडण्यासाठी मंदिर समिती कटिबद्ध असल्याचा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## शिळ व कल्याण फाटा येथे सिग्नल यंत्रणा बसविण्यास सुरुवात; नागरिकांच्या पाठपुराव्याला यश

**अक्षराज : विनोद वास्कर**

**दि.१७, शिळफाटा (ठाणे) :** शिळ गावातील कल्याण फाटा सर्कल व शिळ फाटा जंक्शन येथे दररोज होणारी वाहतूक कोंडी व वाढते अपघात लक्षात घेऊन अखेर ठाणे महानगरपालिकेने सिग्नल यंत्रणा बसविण्यास सुरुवात केली आहे. दिनांक १६ जुलै २०२६ पासून दोन्ही ठिकाणी काम सुरू झाले आहे.दिवा प्रभाग समिती च्या प्रभाग क्रमांक २९ ब च्या नगरसेविका सौ. वेदिका साहिल पाटील यांनी दिनांक १० जून २०२६ रोजी झालेल्या ठाणे महापालिकेच्या महासभेमध्ये या विषयावर आवाज उठवला होता. त्यांनी लेखी पत्राद्वारे कल्याण फाटा सर्कल व शिळ फाटा जंक्शन येथे सिग्नल यंत्रणा बसविण्याची लेखी मागणी केली होती.

**महासभेत मांडले प्रमुख मुद्दे :-**

१) **वाहतूक कोंडी :** रोजच्या गर्दीमुळे नागरिकांना तासंतास ट्रॅफिकमध्ये अडकावे लागत होते.

२) **अपघातांचा धोका :** शाळकरी मुले, ज्येष्ठ नागरिक व पादचाऱ्यांना रस्ता ओलांडणे धोकादायक झाले होते.

३) **अवजड वाहनांची वर्दळ :** शिळ फाटा जॅक्सन सर्कल, कल्याण फाटा येथे २४ तास अवजड वाहतूक असल्याने अपघाताचे प्रमाण वाढले होते.

४) **रुग्णवाहिका व आपत्कालीन वाहने अडकणे :** वाहतूक कोंडीमुळे आपत्कालीन सेवांना विलंब होत होता.




नगरसेविका वेदिका साहिल पाटील यांच्या मागणीची दखल घेऊन ठाणे महानगरपालिका आयुक्त सौरव राव आणि महापालिका सचिव मनीष जोशी यांनी २ महिन्यांत काम पूर्ण करण्याचे आश्वासन दिले होते. दरम्यान, माजी आमदार सुभाष भोईर, मनसे शिळ-देसाई विभाग अध्यक्ष शरद पाटील, दक्ष नागरिक संघ ग्रामीण विभाग, भूमिपुत्र संघ, धर्माभिमानी सेवा संस्था ठाणे, पत्रकार विनोद वास्कर तसेच अनेक सामाजिक संघटना आणि संस्थांनीही कल्याण फाटा व शिळ फाटा येथे सिग्नल बसविण्यासाठी ठाणे महानगरपालिकेकडे निवेदन देऊन सातत्याने पाठपुरावा केला होता. सर्वांच्या संयुक्त प्रयत्नांना यश आले असून दिलेल्या मुदतीतच सिग्नल बसविण्याचे काम सुरू झाले आहे. यामुळे शिळ परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळणार आहे.

अक्षराज



# कल्याणात पुन्हा गँगवॉर? आडीवलीत 'पेंद्या भाई'ची हत्या

**अक्षराज : भानुदास गायकवाड**

**दि.१७, कल्याण (ठाणे) :** कल्याण पूर्वेतील आडीवली परिसर रक्ताने माखला. जुन्या वादातून अर्जुन काळपांडे उर्फ 'पेंद्या भाई' याची धारदार शस्त्राने सपासप वार करून निर्घृण हत्या करण्यात आली.

या हल्ल्यात त्याच्यासोबत असलेली महिला मैत्रीण गंभीर जखमी झाली असून तिच्यावर खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

माहितीनुसार, काही दिवसांपूर्वी अर्जुन काळपांडे याचा अविनाश झा, गौरव उर्फ 'बॉम्बे' आणि त्यांच्या साथीदारांसोबत किरकोळ कारणावरून वाद झाला होता. हा वाद पुढे तीव्र वैमनस्यात बदलला. त्याचाच सूड उगवत आरोपींनी अर्जुनला गाठून त्याच्यावर चाकूने तब्बल १२ ते १३ वार केल्याचा आरोप आहे.



रक्ताच्या थारोळ्यात कोसळलेल्या अर्जुनला तातडीने रुग्णालयात नेण्यात आले. मात्र उपचारापूर्वीच डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. आरोपींनी अर्जुनसोबत असलेल्या महिला मैत्रिणीवरही जीवघेणा हल्ला केला. ती गंभीर जखमी असून तिच्यावर उपचार सुरू आहेत. दरम्यान, सूत्रांच्या माहितीनुसार, सुमारे वर्षभरापूर्वी कल्याण पूर्वेतील १०० फूट रोड चौकात झालेल्या संदीप राठोड हत्याकांडात अर्जुन काळपांडे हा आरोपी होता. तो अवघ्या दोन महिन्यांपूर्वीच जामिनावर कारागृहातून बाहेर आला होता. त्यामुळे ही हत्या जुन्या वैमनस्याचा बदला घेण्यासाठी झाली की त्यामागे अन्य कारण आहे, याचा पोलीस सर्व बाजूंनी तपास करत आहेत.घटनेनंतर आडीवली परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले असून मानपाडा पोलीस ठाण्यात खुनाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मुख्य आरोपी अविनाश झा व त्याच्या साथीदारांचा पोलीस कसून शोध घेत आहेत. या रक्तरंजित हत्येमागील नेमके कारण आणि प्रत्येक आरोपीची भूमिका पोलीस तपासानंतरच स्पष्ट होणार आहे.

# महामार्गावर गुटखा तस्करीचा पर्दाफाश; ३० लाखांचा मुद्देमाल जप्त

## स्थानिक गुन्हे शाखा व तलासरी पोलिसांची संयुक्त धडक कारवाई; ४ आरोपी अटकेत

**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, तलासरी (पालघर) :** मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावर प्रतिबंधित गुटख्याची तस्करी करणाऱ्या आंतरराज्यीय टोळीचा स्थानिक गुन्हे शाखा, पालघर आणि तलासरी पोलिसांनी संयुक्त कारवाईत पर्दाफाश केला. या कारवाईत सुमारे २० लाख ६० हजार ६६ रुपये किमतीचा प्रतिबंधित गुटखा, वाहतुकीसाठी वापरण्यात आलेल्या दोन चारचाकी वाहनांसह सुमारे ३० लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून चार आरोपींना अटक करण्यात आली आहे.

पोलिसांना मिळालेल्या गोपनीय माहितीनुसार, गुजरात मधील वापी, वलसाड, सुरत आदी भागांतून महाराष्ट्रात



मोठ्या प्रमाणावर प्रतिबंधित गुटख्याची वाहतूक होत असल्याची माहिती मिळाली होती. त्यानुसार स्थानिक गुन्हे शाखा व तलासरी ठाण्याचे पोलिस निरीक्षक अजय गोरड यांच्या टीमने पोलिसांनी मुंबई - अहमदाबाद राष्ट्रीय महामार्गावरील तलासरी हद्दीत सापळा रचून दोन संशयित कार अडविल्या. तपासणी दरम्यान वाहनांमध्ये मोठ्या प्रमाणात प्रतिबंधित सुगंधित गुटखा आढळून आला. पोलिसांची दिशाभूल करण्यासाठी वाहनांवर 'भारत सरकार' अशी पाटी तसेच पक्ष्याचे चिन्ह लावण्यात आल्याचेही तपासात समोर आले.

कारवाई दरम्यान जप्त करण्यात आलेल्या मुद्देमालामध्ये सुमारे २०.६० लाख रुपयांचा गुटखा आणि वाहतुकीसाठी वापरलेल्या दोन चारचाकी वाहनांचा समावेश आहे.

या प्रकरणी यशवंत जयराम सिंह, सलीम इसहाक अली शाह, अफजल अजीम अन्सारी आणि विरेश ऊर्फ चेतन वीरेश्वर बालक या चार आरोपींना अटक करण्यात आली असून न्यायालयाने त्यांना पोलीस कोठडी सुनावली आहे. या कारवाईमुळे पालघर जिल्ह्यातील प्रतिबंधित गुटखा तस्करीला मोठा आळा बसण्याची शक्यता व्यक्त होत आहे. या प्रकरणाचा पुढील तपास तलासरी पोलीस करीत आहेत.


# पावसाच्या विश्रांती नंतर पेण पालिकेची स्वच्छता मोहीम

## सफाईची कामे युद्धपातळीवर करण्याचे नगराध्यक्षांचे आदेश

**अक्षराज : मितेश जाधव**

**दि.१७, पेण (रायगड) :** मागील आठवड्यात झालेल्या मुसळधार पावसामुळे पेण शहरात बऱ्याच ठिकाणी पावसाचे पाणी साचून पूरसदृश परिस्थिती निर्माण झाली होती.

मात्र आता पावसाने काही प्रमाणात विशांती घेतल्याने शहरातील सफाईची कामे युद्धपातळीवर करण्याचे आदेश पेणच्या नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी सफाई विभागाला दिले आहेत. नुकत्याच झालेल्या मुसळधार पावसामुळे पेण शहरातील बऱ्याच ठिकाणी पावसाचे पाणी साचले होते, तर बरेच नाले तुडुंब



भरून त्यातून आलेल्या प्लास्टिकच्या बाटल्या, पिशव्या आणि इतर कचरा हा रस्त्यावर आला होता. या सर्व प्रकाराने शहरामध्ये कोणत्याही प्रकारची रोगराई पसरू नये याचा विचार करून पेण शहरात प्रत्येक प्रभागात साफसफाईच्या कामाला प्राधान्य देत सफाई अधिकारी दयानंद गावंड यांनी आपल्या कर्मचाऱ्यांना संबंधित कामे चोखपणे पार पाडण्याचे आदेश दिले. शहरात सफाईचे काम करत असताना छोटे मोठे नाले सफाई, उन्मळून पडलेल्या झाडांच्या फांद्या, नाल्यांमधील काढलेला मलमा उचलणे, शाळा परिसर, सार्वजनिक शौचालय, विविध बगीचे, तलावा भोवतीचे जॉगिंग ट्रॅक, स्मशानभूमी आदी ठिकाणची साफसफाई सफाई कामगारांच्या माध्यमातून करण्यात आली आहे.

सदर सफाई करण्यात आल्यानंतर ठिकठिकाणी पावडर आणि औषध फवारणी करण्यात येणार असून तलावांचे जॉगिंग ट्रॅक किंवा इतर निसटत्या ठिकाणी देखील पावडरचा मारा करण्यात येणार असल्याचे पालिकेचे सफाई अधिकारी दयानंद गावंड यांनी सांगितले. तर पालिकेचे कर्मचारी प्रत्येक ठिकाणी साफसफाई करतच आहेत, मात्र नागरिकांनी देखील घरातील कचरा, प्लास्टिक बॉटल्स गटारामध्ये गटारांमध्ये किंवा सार्वजनिक ठिकाणी न टाकता आपल्या दाराजवळ येणाऱ्या घंटागाडीत टाकून पालिकेला सहकार्य करावे असे आवाहन नगराध्यक्षा प्रितम पाटील यांनी नागरिकांना केले आहे.

# पाटणच्या मुख्य बाजारपेठेत भला मोठा खड्डा अनेक वाहनधारक जखमी

**अक्षराज : सुरेश संकपाळ**

**दि.१७, पाटण (सातारा) :** पाटणच्या हृदय समजल्या जाणाऱ्या मुख्य बाजारपेठेत, गर्दीच्या ठिकाणी असलेल्या बालाजी मोबाईल शॉपी समोर गेल्या अनेक दिवसांपासून एक भला मोठा आणि खोल खड्डा पडला आहे. हा खड्डा नसून जणू मृत्यूचा सापळाच बनला आहे. या खड्ड्यामुळे आतापर्यंत दुचाकीस्वार महिला, शाळकरी मुले आणि वयोवृद्धांसह अनेक वाहनधारक पडून गंभीर जखमी झाले आहेत. तरीही नगरपंचायत प्रशासनाला जाग येत नसल्याने हा खड्डा बुजवायचा की नाही. अजून किती जखमींची वाट नगरपंचायत बघत आहे. असा संतप्त आणि आर्त सवाल वाहनधारक करू लागले आहेत. मुख्य बाजारपेठ - जिथे दिवसभर हजारो लोकांची वर्दळ असते. ह्याच रस्त्यावर प्रांत कार्यालय, तहसीलदार कार्यालय, पंचायत समिती कार्यालय, पोलीस ठाणे, कॉलेज, प्राथमिक शाळा, विद्यालय आणि विविध कार्यालय आहेत. त्यामुळे ह्या रस्त्यावर रोज वाहनधारक व नागरिक ये जा करत असतात त्यांना या खड्ड्याचा मोठा मनस्ताप होत आहे. बालाजी मोबाईलच्या



**हा खड्डा नसून नगरपंचायतीच्या भ्रष्ट कारभाराचे स्मारक आहे. मुख्य बाजारपेठेतील खड्डा भरला नाही तर आम्ही त्याच खड्ड्यात वृक्षारोपण करून नगरपंचायतीचा निषेध करू असा इशारा सामाजिक कार्यकर्ते नितीन पिसाळ यांनी दिला.**

अगदी समोर रस्त्याच्या मधोमध सुमारे ३ फूट लांब, २ फूट रुंद आणि १ ते दीड फूट खोल खड्डा पडला आहे.बाजारात गर्दी असल्याने आणि खड्ड्यात पाणी साचल्याने लांबून खड्ड्याचा अंदाज येत नाही. दुचाकीचा पुढचा टायर थेट आत जातो आणि गाडी पलटी होते.

जखमींची मालिका सुरूच आहे. ३ दिवसांपूर्वी एका शाळकरी मुलीची सायकल खड्ड्यात जाऊन ती पडली, तिच्या हाताला दुखापत झाली परवा संध्याकाळी एका महिलेची ॲक्टिव्हा पलटी होऊन तिच्या गुडघ्याला गंभीर दुखापत झाली. दिनांक १६ जुलै राजी रात्री अंधारात एका वयोवृद्धाला खड्डा दिसला नाही, ते पडून त्यांच्या बरगड्यांना मार लागला. रोज ३ ते ४ ऑटो आणि दुचाकींचे टायर, रिम वाकण्याच्या घटना घडत आहेत.हा खड्डा आहे की खड्ड्यात रस्ता आहे तेच कळत नाही. आम्ही दुकानदार रोज ओरडून सांगतो, पण कोणी ऐकतच नाही असा संताप पाटण शहरातील नागरिक करत आहेत नगरपंचायतीचा निष्काळजीपणा - अपघाताची वाट पाहतंय का नगरपंचायतीकडे एक पोती खडी आणि सिमेंटही नाही का? असा प्रश्न व्यापारी विचारत आहेत. जर हाच खड्डा बुजवायला टेंडर काढणार असेल तर तोपर्यंत किती जणांचे हात-पाय तुटणार? असा संताप वाहनधारक पाटण नगरपंचायतीच्या नावाने करत आहेत.

# इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्या नवीन कार्यकारिणीचा आज पदग्रहण सोहळा

**अक्षराज : दिवाकर घेर**

**दि.१७, नागपूर :** इनर व्हील क्लब ऑफ नागपूर ऑरेंज सिटीच्या वर्ष २०२६-२७ च्या नवीन कार्यकारिणीचा पदग्रहण सोहळा शनिवार, दिनांक १९ जुलै २०२६ रोजी उत्साहात संपन्न होणार आहे. या समारंभासाठी इनर व्हील डिस्ट्रिक्ट ३०३च्या जिल्हाध्यक्षा मनीषा चौधरी या प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित राहणार असून प्रियंका ठाकूर या अतिथी म्हणून उपस्थित राहतील. यावेळी नवीन कार्यकारिणीचा पदभार स्वीकारण्याचा सोहळा पार पडणार असून ही नूतन कार्यकारिणी पुढील एक वर्ष क्लबच्या विविध सामाजिक, शैक्षणिक व सेवाभावी उपक्रमांचे नेतृत्व करणार आहे .नवीन कार्यकारिणीमध्ये अध्यक्ष म्हणून स्मिता बागडदेव, आयपीपी डॉ.शारदा रोशनखेडे, उपाध्यक्षा राधा पटेल, सचिव सौ.मोनिका वारोतकर, कोषाध्यक्षा सौ.सुप्रिया पाठक, आयएसओ वैशाली चिंचोलकर, संपादक सीमा मेटांगळे, सीसीसीसी कोमल अकबरी तर कार्यकारी प्रतिनिधीपदि रीता रावका, प्रीती जैन, मनीषा जैन, प्रीती नवले आणि ममता वालदे आदींचा समावेश आहे. या पदग्रहण सोहळ्याला इनर व्हीलच्या सर्व पदाधिकाऱ्यांसह विविध क्लबच्या सदस्यांची उपस्थिती अपेक्षित असून नव्या कार्यकारिणीच्या माध्यमातून समाजोपयोगी उपक्रमांना अधिक गती मिळेल असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

# थोडक्यात बातम्या

## सावरोलीतील जीवन दवणे यांचा अनोखा उपक्रम

**अक्षराज : सुनिल फर्डे**



**दि.१७, शहापूर (ठाणे) :** सावरोली येथील 'जय हनुमान घाणा'चे चालक जीवन शंकर दवणे हे आदिवासी बांधवांसाठी कौतुकास्पद कार्य करत आहेत. त्यांच्या घाण्यावर दरवर्षी अनेक आदिवासी कुटुंब मोहाचे तेल काढण्यासाठी येतात. विशेष म्हणजे, दवणे हे तेल गाळण्यासाठी एकही रुपया आकारत नाहीत. ते पूर्णपणे मोफत सेवा देतात.या सेवेच्या बदल्यात ते फक्त तेल काढल्यानंतर उरणारी 'पेंड' स्वतःकडे ठेवतात, जी खत किंवा पशुखाद्य म्हणून उपयोगी पडते. इतकेच नव्हे, तर दूरवरून आलेल्या बांधवांना उशीर झाल्यास त्यांच्या राहण्याची व नाश्ता-पाण्याची व्यवस्था देखील दवणे स्वतःच्या खर्चाने करतात. त्यांच्या या दातृत्वामुळे आदिवासी बांधवांना मोठा दिलासा मिळत आहे.

पावसाळ्यातील जीवनरेखा ठरते मोहाचे तेलआरोग्यासाठी पौष्टिक मानले जाते. जंगलातून मोहाची फळे गोळा करून, बिया सुकवून घाण्यावर आणल्या जातात. एका हंगामात एक कुटुंब साधारण ४ ते ५ डबे तेल काढते. दुर्गम भागात पावसाळ्यात रस्ते बंद असताना हेच तेल जीवनरेखा ठरते. जंगलातील मोह आणि आंब्याची झाडे ही आदिवासी संस्कृती व उदरनिर्वाहाचा कणा आहेत.मोहाची झाडे तोडू नकाजाणकारांचे आवाहनवाढते शहरीकरण आणि विकासकामांच्या नावाखाली होणाऱ्या जंगलतोडीबाबत स्थानिक पर्यावरणप्रेमींनी चिंता व्यक्त केली आहे. मोहाची झाडे ही आदिवासींच्या रोजगाराचे आणि जगण्याचे साधन आहे. त्यामुळे विकासकामे करताना ही झाडे तोडू नयेत, उलट त्यांचे संवर्धन करावे, असे मत जाणकारांनी व्यक्त केले.एकीकडे महागड्या तेलामुळे सर्वसामान्यांचे जगणे कठीण होत असताना, सावरोलीतील जीवन दवणे यांच्यासारख्या समाजाभिमुख व्यक्तीमुळे आणि निसर्गाच्या या देणगीमुळे आदिवासी पाड्यांवर महागाईची झळ काहीशी कमी जाणवत आहे.

## वीर योद्धा प्रतिष्ठानकडून वारकऱ्यांना फळे व पाणी बॉटल्सचे वाटप

**अक्षराज : बाळू धायगुडे**



**दि.१७, खंडाळा (सातारा) :** संत ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्याचे प्रस्थान झाले असून, लाखो वैष्णवांचा मेळा पंढरीच्या वाटेवर मार्गस्थ झाला आहे. या आषाढी वारीचे औचित्य साधून वीर योद्धा प्रतिष्ठान महाराष्ट्र राज्य च्या वतीने वारीतील वारकरी भाविकांसाठी पाणी बॉटल्स आणि ताज्या फळांचे वाटप करण्यात आले. माऊलींच्या भक्तांची सेवा करण्याच्या उद्देशाने हा स्तुत्य उपक्रम राबवण्यात आला. या सेवाकार्याचे आयोजन आणि नियोजन वीर योद्धा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बापू ढावरे यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले होते. उन्हा-तान्हात विठ्ठल नामाचा गजर करत जाणाऱ्या वारकऱ्यांना या उपक्रमामुळे मोठा दिलासा मिळाला. या प्रसंगी प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष बापू ढावरे यांच्यासह बारामती तालुका अध्यक्ष अमोल बनसोडे खंडाळा तालुका अध्यक्ष स्वप्निल जावळे आणि पुरंदर तालुका अध्यक्ष नितीन साळुंखे आदी मान्यवर प्रामुख्याने उपस्थित होते. तसेच या सेवाकार्यात धनंजय खरात, अनिकेत बिचुकले, रोहन ढावरे, दादा धायगुडे, अभी भैया बिचुकले, महेश खरात, चिकू खरात, सुरज धायगुडे, भाऊ फडतरे, अनिकेत कांबळे, सनी ढावरे, विराज भोसले,यांसह प्रतिष्ठानचे अनेक पदाधिकारी, कार्यकर्ते आणि मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. प्रतिष्ठानच्या सर्व सदस्यांनी अत्यंत उत्साहाने आणि सेवाभावी वृत्तीने वारकऱ्यांची सेवा केली. वीर योद्धा प्रतिष्ठानच्या या सामाजिक उपक्रमाचे सर्वच स्तरातून भरभरून कौतुक होत आहे.

## कोशिश फाउंडेशन तर्फे पर्यावरण सौंदर्यीकरण कार्यक्रम

**अक्षराज : दिवाकर घेर**



**दि.१७, नागपूर :** सामाजिक कार्यक्रम राबविणाऱ्या खापरखेडा येथील कोशिश फाउंडेशनचे मुख्य संयोजक कपिल वानखेडे यांच्या पुढरकाराने चनकापूर, वॉर्ड क्र.१ येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर उद्यानात पर्यावरण सौंदर्यीकरण उपक्रम उत्साहात संपन्न झाला. यावेळी उद्यानात रॉयल पाम वृक्षाचे वृक्षारोपण करण्यात आले. उद्यानाचा विकास, सौंदर्यीकरण तसेच नियमित देखभाल आणि स्वच्छता राखण्यासाठी प्रत्येक रविवारी श्रमदान करण्याचा संकल्प उपस्थितांनी केला. या उपक्रमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत नागरिकांमध्ये सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण करण्यात आली.या कार्यक्रमास भीमराव तागडे, केवल मेंढे, मनोहर डोंगरे, दीक्षम डोंगरे, व्ही. शेंडे, साजिद भाई, सिद्धार्थ बागडे, महेंद्र गोडबोले, ईश्वर बर्वे आणि गजानन बहुरूपी यांची प्रमुख उपस्थिती लाभली. कोशिश फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कपिल वानखेडे, ईश्वर ठाकरे, कैलाश गजभिये, रामभाऊ मेश्राम, दिलीप मंडपे, उत्कर्ष ठाकरे आणि वासुदेव वानखेडे यांनी विशेष परिश्रम घेतले. उपस्थितांनी भविष्यातही अशाच सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला.

## कानगावच्या जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल दिंडीचे आयोजन



**अक्षराज : प्रतिनिधी**

**दि.१७, दौंड :** विद्यार्थ्यांमध्ये वारकरी संप्रदायाची रुजवणूक व्हावी, विद्यार्थ्यांनाही वारीचा आनंद घेता यावा या उद्देशाने कानगावच्या (तालुका दौड) जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत बाल दिंडीचे आयोजन करण्यात आले होते. या बालदिंडीत मुलांनी वारकऱ्यांची वेशभूषा परिधान केली होती. तर मुलींनी साडी परिधान करून डोक्यावरती तुळस, कलश घेऊन आनंदाने बालदिंडीत सहभागी झाल्या होत्या. पालखी, वीणा पूजन झाल्यानंतर पालखी प्रस्थान सुरू झाले. ग्राम पंचायतीच्या प्रांगणात रिंगण सोहळा व भजन आयोजित करण्यात आले. यावेळी गावातील भजनी मंडळाने वारी मध्ये आवर्जून सहभाग घेतला अभंग, गवळण यांचा गजर झाला. गावातील विठ्ठल मंदिरात भजनी मंडळ, ग्रामस्थ, पालक, प्रतिष्ठित नागरिक, शिक्षक - शिक्षिका, तसेच विद्यार्थ्यांनी फुगडीचा आनंद घेतला. शेवटी गावातील दत्त मंदिरात शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना महाप्रसाद देण्यात आला. बालदिंडीला गावातील भजनी मंडळ, शाळा व्यवस्थापन समिती, ग्रामस्थ, पालक, तरुण मंडळ यांचे अनमोल योगदान लाभले. दत्तप्रसाद भजनी मंडळाने मुलांसाठी महा प्रसादाचे आयोजन केले होते काही पालक व ग्रामस्थांनी मुलांना बिस्किटे तसेच खाऊचे वाटप केले.